जनसंपर्क कक्ष

25 SEP 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिंदीची जागतिक भाषेकडे वाटचाल

■ प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांचे मत

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरणामुळे हिंदीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. जागतिक पातळीवर हिंदीमध्ये शिकणाऱ्यांना अनेक रोजगार उपलब्ध होत आहेत. हिंदीची आता जागतिक भाषा होण्याकडे वाटचाल सुरू आहे, असे मत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागात हिंदी दिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. संतोष कोळेकर उपस्थित होते.

डॉ. देशमुख म्हणाले, सार्क, युरोपियन देशांतील हिंदीचे वाढत असल्याचे सांगत पारंपारिक ज्ञानाचा वापर रोजगारांच्या संधीसाठी करण्याचे आवाहन केले. डॉ. करेकट्टी म्हणाल्या, जागतिक स्तरावर भाषांतरकारांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यार्थ्यांनी हिंदीबरोबर इतर भाषांमध्येही प्रावीण्य मिळवणे आता काळाची गरज आहे. पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रकाश निकम यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. जयसिंग कांबळे यांनी केले. डॉ. प्रकाश मुंज यांनी आभार मानले. यावेळी प्रा. अनिल मकर, डॉ. सुषमा चौगले, उपस्थित होते.

यावेळी रांगोळी व स्वरचित काव्य वाचन स्पर्धा झाल्या. हिंदीचे जागतिक स्थान दर्शवणारा नकाशा, भारतीय संस्कृती, पृथ्वी वाचवा, प्रदूषण इत्यादी विषयांच्या रांगोळी काढल्या होत्या.

पुढारी

# कौशल्य विकास केंद्रे मार्गदर्शक ठरतील : शिंदे

## दत्त द्वारका महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

**कोपार्डे : पुढारी वृत्तसेवा**

तंत्रज्ञानामुळे माध्यमांत वैविध्य व विस्तार झाला आहे. बदल आत्मसात करून त्याचा कामात वापर करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर कौशल्य विकास केंद्रे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी केले. वाकरे येथील दत्त द्वारका महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य स्वागत परुळेकर होते.

संस्थेचे अध्यक्ष नवनाथ पोवार यांनी स्वागत केले. प्राचार्य रूपाली पोवार यांनी आभार मानले. यावेळी हंबीरराव पाटील, दत्तात्रय मेडसिंगे, नवनाथ पोवार, सरपंच अश्विनी पाटील, प्रा. रूपाली पोवार, डॉ. के. एन. पाटील आदी उपस्थित होते.

सकाळ

# शिक्षण सहसंचालकपदी प्रा. डॉ. धनराज नाकाडे

## डॉ. अशोक उबाळे यांची पुण्यात बदली



धनराज नाकाडे

कोल्हापूर, ता. २४ : राजाराम महाविद्यालयातील प्रा. डॉ. धनराज नाकाडे यांची शिक्षण सहसंचालकपदी नियुक्ती झाली. त्याबाबतचे पत्र त्यांना सोमवार (ता. २३) रात्री उशिरा मिळाले. दरम्यान, शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक उबाळे यांची पुणे येथे बदली झाली.

डॉ. नाकाडे मूळचे कंदलगाव येथील आहेत. ते राजाराम महाविद्यालयात तीस वर्षे अध्यापनाचे काम करत आहेत. ते मायक्रोबायॉलॉजी व इंडस्ट्रियल मायक्रोबॉयॉलॉजी विषयाचे प्राध्यापक असून, त्यांचे आतापर्यंत चाळीस संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी दुबई, श्रीलंका, मॉरिशस, हंगेरी, कॅनडा देशांत संशोधनाचे सादरीकरण केले आहे. त्यांची मायक्रोबॉयॉलॉजीवर तीन पुस्तके प्रसिद्ध झाली असून, त्यांची नियुक्ती वर्षासाठी आहे.

दरम्यान, डॉ. उबाळे १६ डिसेंबर २०१९ ते १४ जुलै २०२१ दरम्यान येथे शिक्षण सहसंचालक होते. त्यांची सोलापूरला बदली झाल्यानंतर डॉ. हेमंत कटरे यांची शिक्षण सहसंचालकपदी नियुक्ती झाली. त्यांच्यानंतर पुन्हा राजेसाहेब मारडकर पदावर विराजमान झाले. या पदाचा डॉ. कटरे यांच्याकडे या पदाचा कार्यभार पुन्हा आला. ते एका प्रकरणात लाचलुचपतच्या जाळ्यात अडकल्याने १० जुलै २०२३ ते २३ सप्टेंबर २०२४ पर्यंत सूत्रे उबाळे यांच्याकडे आली होती.

**प्रश्नांना न्याय देण्याची अपेक्षा**

शिक्षण सहसंचालक कार्यालय नेहमीच अर्थपूर्ण व्यवहाराच्या चर्चेने गाजते. विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे असंख्य प्रश्न आहेत. त्या प्रश्नांना न्याय देणारा शिक्षण सहसंचालक हवा, अशी अपेक्षा आहे.

लोकमत

# नाकाडे 'उच्च शिक्षण'चे विभागीय सहसंचालक

कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षण



कोल्हापूर विभागीय सहसंचालकपदी डॉ. धनराज नाकाडे यांची मंगळवारी नियुक्ती करण्यात आली. सहसंचालक डॉ. अशोक उबाळे यांची पुणे येथे बदली करण्यात आली असून, त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार राजाराम महाविद्यालयामधील प्राध्यापक डॉ. धनराज नाकाडे यांच्याकडे देण्यात आला. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मंगळवारी यासंबंधीचा आदेश काढला. नवे विभागीय सहसंचालक डॉ. नाकाडे हे कंदलगाव (ता. करवीर) गावचे असून, राजाराम महाविद्यालयात सूक्ष्म जीवशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत. आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांचे संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत. डॉ. उबाळे यांनी जुलै २०२३ मध्ये विभागीय सहसंचालकपदाचा कार्यभार घेतला होता.

सकाळ

# कला, संस्कृतीच्या प्रचारासाठी अनुवाद महत्त्वाचा : डॉ. निर्मल

कोल्हापूर, ता. २४ : 'कला आणि संस्कृतीचा प्रचार करण्यासाठी अनुवाद महत्त्वाचा आहे,' असे प्रतिपादन जम्मू-कश्मीर येथील राजभवन सहायक संपादक प्रा. डॉ. यशपाल निर्मल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील हिंदी विषय आणि प्लेसमेंट सेल अंतर्गत हिंदी दिनानिमित्त 'हिंदी अनुवाद का महत्त्व आणि रोजगाराच्या संधी' या विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. उपकुलसचिव डॉ. व्ही. बी. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

प्रा. डॉ. निर्मल म्हणाले, कला, संस्कृती, संशोधन, योग, विज्ञानाच्या ज्ञानासाठी अनुवाद महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे आजच्या काळात अनुवादाचे महत्त्व वाढत चालल्याचे दिसून येते. जागतिक संस्कृतीमध्ये हिंदी अनुवादाला विशेष महत्त्व आहे. लोकप्रिय ग्रंथ साहित्याचे अनुवाद करण्यासाठी मागणी वाढत आहे. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. वाय. चोपडे यांनी परिचय करून दिला. प्रा. एस. डी. भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले.

सकाळ

# 'वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका'साठी ऑनलाईन प्रवेश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी ३० सप्टेंबर कालावधीपर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असून, प्रवेशाकरिता शैक्षणिक पात्रता ही कोणत्याही शाखेतील पदवी आहे. वस्तुसंग्रहालयशास्त्र अभ्यासक्रमात संग्रहालय व्यवस्थापन, ऐतिहासिक वस्तुसंग्रह, प्राचीन वस्तूंचा अभ्यास, संग्रहालयातील वस्तूंची मांडणी, प्रदर्शन, वस्तूंचे दस्तावेजीकरण तसेच जतन आणि संवर्धनाबाबतचे ज्ञान देणारा हा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमातून संग्रहालय संचालक, अभिरक्षक, चित्ररक्षक सहायक, व्यवस्थापक, कलादालन व्यवस्थापक अशा संधी आहेत. संग्रहालय क्षेत्रात उत्तम करिअरच्या दृष्टिकोनातून उपलब्ध होऊ शकतात. विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले.

तरुण भारत

# वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला प्रारंभ

**कोल्हापूर :** इतिहास अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. ही प्रवेश प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन सुरू राहणार आहे. तरी इच्छुकांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले.

वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रमाचा कालावधी १ वर्षाचा असून प्रवेशाकरीता शैक्षणिक पात्रता ही कोणत्याही शाखेतील पदवी आहे.

वस्तुसंग्रहालयातील वस्तु प्रेक्षकांना पाहण्यासाठी प्रदर्शित करून ठेवलेल्या असतात. ऐतिहासिक अभ्यासासाठी, संशोधनासाठीही उपयुक्त असतात. अभ्यासक्रमात संग्रहालय व्यवस्थापन, ऐतिहासिक वस्तुसंग्रह, प्राचीन वस्तूंचा अभ्यास, संग्रहालयातील वस्तूंची मांडणी, प्रदर्शन, वस्तूंचे दस्तऐवजीकरण तसेच जतन आणि संवर्धन याबाबतचे ज्ञान देणारा हा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमातून संग्रहालय संचालक, अभिरक्षक, चित्ररक्षक सहाय्यक, व्यवस्थापक, कलादालन व्यवस्थापक, अशा अनेक संधी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संग्रहालय क्षेत्रात उत्तम करिअरच्या दृष्टीने उपलब्ध होऊ शकतात.

तरुण भारत

# कला, संस्कृतीच्या प्रचारासाठी अनुवादाची गरज : डॉ. निर्मल

कोल्हापूर : कला आणि संस्कृतीच्या प्रचारासाठी अनुवाद महत्वाचा आहे, असे प्रतिपादन जम्मू कश्मीर येथील डॉ. यशपाल निर्मल यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील हिंदी विषय व प्लेसमेंट सेल अंतर्गत 'हिंदी अनुवाद का महत्त्व आणि रोजगारसंधी' ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. व्ही. बी. शिंदे होते. डॉ. निर्मल म्हणाले, अनुवाद क्षेत्रात बाजार तंत्रामुळे मानव संसाधन, वाणिज्य, बँक, पर्यटन, तीर्थक्षेत्र, प्रशासन क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. जागतिक संस्कृतीमध्ये हिंदी अनुवादाला विशेष महत्त्व आहे. ग्रंथ साहित्याच्या अनुवादासाठी मागणी वाढत आहे. अनुवाद क्षेत्राकडे विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. वाय. चोपडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. एस.डी. भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. ए. बंडगर यांनी आभार मानले.